**अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे आरक्षण) अधिनियम,१९९५ नुसार शासकीय परिवहन सेवा कार्यालयातील पदोन्नतीची पदे शारिरीकदृष्ट्या अपंगांसाठी आरक्षित करणे**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक: शापसे २०११/प्र.क्र. ७ - अ/११/ ३१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : २० ऑगस्ट, २०११

**वाचा :-** शासन निर्णय समक्रमांक दिनांक १२ जानेवारी, २०११

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे आरक्षण) अधिनियम,१९९५ नुसार आणि केंद्र शासनाने अपंगांसाठी आरक्षित ठेवलेली पदे व अपंगांचा प्रकार विचारात घेऊन, उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १२ जानेवारी,२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय परिवहन सेवा कार्यालयातील सरळसेवेने शारिरीकदृष्ट्या अपंगांमधून भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहे. या पदांव्यतिरिक्त शासकीय परिवहन सेवेतील त्या संवर्गातील पदोन्नतीची पदेही अपंग आरक्षणासाठी निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** संदर्भाधीन दिनांक १२ जानेवारी, २०११ मधील परिच्छेद क्र. ६ मधील पदोन्नतीच्या पदांस अपंग आरक्षण लागू नाही, ही बाब या शासन निर्णयाव्दारे रद्द करण्यात येत आहे.

२. शासकीय परिवहन सेवेतील खालील पदोन्नतीची पदे, अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे आरक्षण) अधिनियम, १९९५ अंतर्गत तरतूदीनुसार, त्यांच्या पदनामासमोर दर्शविलेल्या शारिरीकदृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी, या शासन निर्णयान्वये आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | गट ब आणि गट क मधील अपंगांसाठी निश्चित केलेली पदे | अपंग आरक्षणाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | कार्यालयीन अधीक्षक - वर्ग -ब | OA, OL, LV |
| २ | प्रमुख लिपीक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ३ | सहाय्यक लेखापाल - वर्ग - क | OA, OL, LV |
| ४ | वरिष्ठ लिपीक तथा रोखपाल - वर्ग - क | OA, OL, LV |
| ५ | वरिष्ठ लिपीक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ६ | नोंदणी पर्यवेक्षक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ७ | सहाय्यक नोंदणी पर्यवेक्षक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ८ | नोंदणी लिपीक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ९ | भांडारपाल - वर्ग - क | OA, OL, LV |
| १० | भांडार सहाय्यक - वर्ग - क | OA, OL, LV |
| ११ | भांडार खरेदीदार - वर्ग - क | OA, OL, LV |
| १२ | वेचणीकार - वर्ग - क | OA, OL, LV |

( OA - एका हाताने विकलांग, OL - एका पायाने विकलांग, LV - मंद दृष्टी असलेले )

\\10.186.20.245\sanju\GTS-PEON.doc

३. सदरहू पदांवर पदोन्नती देतांना, त्या पदाचे नियम व टक्केवारी विचारात घेऊन, त्याची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनांच पदोन्नती देण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०८२७१४४७३८००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(रा. को. बोरकर)
उप सचिव (राजशिष्टाचार) महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) आयुक्त, अपंग कल्याण, ३ चर्च रोड, पुणे
४) मा. राजशिष्टाचार मंत्री यांचे स्वीय सहाय्यक
५) मा. राजशिष्टाचार राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
६) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
७) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१६ -अ), मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१९ -अ), मंत्रालय, मुंबई
९) उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) निवड नस्ती